नि. दि. दावा क्र. १२४/२०२२
संदिप विरुध्द अनिल
**MHWS**080017062022

## निशाणी क्र.५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २, कलम १५१ अन्वये तात्पुरता स्वरुपाचा मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

### वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द उद्घोषणेबाबत व कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत केलेला आहे. मौजे करंजी गरड, ता. रिसोड, जि. वाशिम येथील गट नं.७,२.०० हे.आर., ३ आ.१२ रु. हा विषय असुन यापुढे शेतजमिनीस दावा मिळकत संबोधण्यात येईल. तसेच यापुढे वादीस व प्रतीवादीस अर्जदार व गैरअर्जदार असे संबोधन्यास येईल.

३. अर्जदार असे कथन करतो की, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचा सख्खा भाउ असुन गैरअर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. गै.अ. क्र.१ हा पुर्वी पासुन मानसिक रोगाने आजारी असुन तो कोणताही कामधंदा करत नाही, त्याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदाराने गै.अ.१ चा पुर्वीपासुन सांभाळ केला असुन त्याचे कुटुंबाचा देखील अर्जदार सांभाळ करतो गै.अ. क्र. १ ची देखभाल व दवाखाण्याचा खर्च अर्जदार करतो या सर्व बाबींची माहिती व जाणीव गै.अ. क्र.२ ला आहे. अर्जदाराने गै.अ.क्र.१ च्या भविष्याचा विचार करुन व त्याचे हित जोपासण्याकरीता दिनांक १३.१०.२००५ रोजी वाद मिळकतीपैकी १ हे. शेत जमिन ही अर्जदाराने सुभाष शामराव राउत याचे कडुन गै.अ. क्र.१ चे नावे विकत घेतली. सदर खरेदी व्यवहाराची संपुर्ण रक्कम ही अर्जदारानेच दिलेली आहे. सदर खरेदी तारखेपासुन सदरची शेत जमिन ही अर्जदाराचे एक सारखी ताब्यात व वहितीत असुन तो पिके घेत आहे. तसेच, अर्जदाराने वाद मिळकतीपैकी १ हे. शेत जमिन ही सन २०१२ साली गै.अ. क्र.१ यास तात्पुरत्या स्वरुपात वाटुन दिली. सदरचे दोन्ही व्यवहार हे अर्जदाराने गै.अ. क्र.१ हा त्याचा भाउ असल्याने व अर्जदाराचे त्याच्यावर नैसर्गिक प्रेम असल्याने केले होते, परंतु प्रत्यक्षात संपुर्ण वाद मिळकत ही पुर्वी पासुन ते आजतागायत गै.अर्जदाराचे एकसारखी व ताब्यात व वहितीत आहे. गै.अ. क्र.१ हा मानसिक रुग्ण असल्याने तो कोणताही कामधंदा करु शकत नाही.

४. अर्जदार पुढे असे कथन करतो की, दिनांक ०७.०३.२०२२ रोजी गै.अ. क्र.२ ने गै.अ. क्र.१ च्या मानसिक रोगाचा गैरफायदा घेवुन वाद मिळकतीचे स्वतःच्या हक्कात

बक्षिसपत्र करुन घेतले. वास्तविकता गैरअर्जदार क्र.१ ने कधीही स्वईच्छेने गै.अ. क्र.२ चे हक्कात बक्षिसपत्र करुन दिलेले नसुन सदरचे बक्षिसपत्र हे गै.अ. क्र.१ ला मान्य नाही. गै.अ. क्र.२ ने गै.अ. क्र.१ च्या मानसिक रोगाचा गैर फायदा घेवुन परपुरुषाशी अनैतिक संबंध प्रस्थापीत केले असुन तिच्या संभाषणाचे पुरावे अर्जदाराकडे आहेत. गै.अ. क्र.२ ने स्वतःच्या हक्कात करुन घेतलेले बक्षिसपत्र हे फसवणुक करुन घेतले असुन त्यावरील साक्षीदार हे गै.अ. क्र.२ चे आई व भाउ आहेत. तात्पुरत्या स्वरुपात केलेल्या खरेदीखत व वाटणीपत्राआधारे गै.अ. क्र.१ हा वाद मिळकतीचा मालक होवु शकत नाही व त्यास वाद मिळकतीचे बक्षिसपत्र करण्याचा कोणताही अधिकार नाही. महसुल दप्तरी गै.अ. क्र.१ चे नावे असलेल्या नोंदीचा व मानसिक आजाराचा गैरफायदा घेवुन गै.अ. क्र.२ ने स्वतःच्या हक्कात करुन घेतलेल्या बक्षिसपत्राद्वारे तिला कोणताही मालकी हक्क प्राप्त होत नाही. सदरचे बक्षिसपत्र बेकायदेशीर असुन ते अर्जदारावर बंधनकारक नाही. अशापरिस्थितीत गै.अ. क्र.२ हिने गै.अ. क्र.१ कडुन दिनांक ०७.०३.२०२२ रोजी वाद मिळकतीचे स्वतःचे हक्कात करुन घेतलेले बक्षिसपत्र हे बेकायदेशीर व खोटे असुन ते अर्जदारावर बंधनकारक नाही असे उद्घोषित करुन मिळणेकरीता अर्जदाराने मुळ दावा दाखल केलेला आहे.

५. अर्जदार पुढे असे कथन करतो की, दिनांक ३०.११.२०२२ रोजी अर्जदार हा वाद मिळकतीत असलेल्या गहयाच्या व तुरीच्या पिकाला पाणी देत असताना गै.अ. क्र.२ ही काही अनओळखी लोकांना घेवुन वादमिळकतीत आली व अर्जदाराला म्हणाली की, तु या शेतात काय करत आहे, सदरचे शेत माझ्या मालकीचे आहे, त्यावेळी अर्जदाराने समजावण्याचा प्रयत्न केला असता गै.अ. क्र.२ म्हणाली की, ''गैरअर्जदार क्र.१ ने सदरच्या शेत जमिनीचे माझ्या हक्कात बक्षिसपत्र करुन दिले असुन मी सदर शेताची मालकीन आहे, मी या जमिनीचा ताबा घेवुन सदरचे शेत मी या लोकांना विक्री करणार आहे'' अर्जदाराने गै.अ. क्र.२ ला समजवण्याचा प्रयत्न केला असता तिने अर्जदारास शिवीगाळ केली व म्हणाली की, अर्जदाराने जर तिला अडविले तर ती त्याच्या विरुध्द विनयभंगाची खोटी तक्रार करेल अशी धमकी दिली व तेथुन निघुन गेली. सदर घटनेचा रिपोर्ट देण्याकरीता अर्जदार हा पोलीस स्टेशन, रिसोडला गेला असता संबंधीत पोलीस अधिका–यांनी प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याने न्यायालयात जाण्याची समज दिली. गै.अ. क्र.२

ही वाद मिळकतीवर कधीही जबरीने ताबा घेवुन वादमिळकतीची विल्हेवाट लावेल अशी भिती अर्जदाराचे मनात निर्माण झाली आहे असे झाल्यास अर्जदाराचे न भरुन निघणारे नुकसान होईल. त्यामुळे, गै.अ. क्र.२ ने अर्जदाराच्या ताब्यात व वहितीत असलेल्या वाद मिळकतीस हरकत, अडथळा करु नये व वाद मिळकतीचे कोणत्याही स्वरुपात हस्तांतरण करु नये असा तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे. अर्जदाराची सकृतदर्शणी केस असुन न्यायाचा समतोल अर्जदाराच्या हक्कात आहे व अर्जदाराला त्वरीत तात्पुरता मनाई हुकुम न मिळाल्यास अर्जदारचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल त्या कारणाने अर्जदाराने तात्पुरता मनाई हुकुम करण्यात यावा अशी विनंती केली.

६. गै.अ. क्र.२ ने निशानी क्र.२७ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे व दाव्यास कैफियत दाखल करुन अर्जास विरोध दर्शविलेला आहे. गैरअर्जदाराने असे अधिकचे कथन मांडले आहे की, अर्जदार हा तिचा भाया असुन गै.अ. क्र.२ ही गै.अ.क्र. ०१ ची पत्नी आहे. तिचे सासरे हे माजी सैनिक होते. त्यांच्या मृत्युपर्यंत अर्जदार व गै.अ. यामध्ये कोणताही वाद नव्हता. परंतु, गै.अ. क्र.२ चे सासरे सिताराम राउत हे मयत झाल्यानंतर अर्जदार हा घराचा कुटुंबप्रमुख झाला व कारभार पाहत असताना अर्जदार व गै.अ. क्र.१ च्या वडिलांच्या सांगण्यानुसार अर्जदाराने गै.अ. क्र.१ याचे नावाने २ हे. जमिन रजिस्टर बक्षिसपत्राने करुन दिलेली आहे असे असताना गै.अ. क्र.१ व २ यांचे अर्जदारासोबत वाटणी बाबत वाद होत होते व गैरअर्जदार यांना अर्जदार हा जमिन वाटुन देत नव्हता. त्यामुळे, गावातील पंचासमक्ष व नातेवाईका समक्ष गै.अ. क्र.१ ने त्याची पत्नी गै.अ. क्र.२ हिला दिनांक ०७.०३.२०२२ रोजी वादमिळकतीचे रजिस्टर बक्षिसपत्र विनामुल्य करुन दिले. तेव्हा पासुन गै.अ.क्र.१ व २ हे अर्जदारा पासुन अलग राहत होते. त्यांचा संसार सुखात चालु होता व ते शेती करत होते. परंतु, अर्जदाराच्या मनात बेईमानी आली व अर्जदाराचा भाउ गै.अ. क्र.१ हा थोडा वेडसर असल्यामुळे त्याच्या वेडसर पणाचा फायदा घेवुन अर्जदार हा वाद मिळकत व त्याच्या व्यतिरिक्त मिळकती हडप करण्याचा प्रयत्न करीत आहे.

७. गै.अ. क्र.२ चे पुढे कथन असे की, शिक्षीत असुन ति तिच्या पतीसोबत चांगला संसार करीत असताना अर्जदाराने दोघाच्या संसाराची राख

रांगोळी व्हावी व त्यांच्या हिश्याची पुर्ण जमिन हडप करण्याच्या उद्देशाने अर्जदाराने सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. तसेच, तिला उदवस्थ करण्याच्या उद्देशाने खोटे आरोप लावुन वाद मिळकत हस्तगत करण्याचा अर्जदार प्रयत्न करीत आहे. गै.अ. क्र.२ ला गै.अ. क्र.१ पासुन एक मुलगा नामे विनायक हा आहे. त्या मुलाच्या भविष्याच्या व शिक्षणाचा संपुर्ण खर्च व जबाबदारी गै.अ. क्र.२ ची आहे तसेच तिला आधार उरला नाही. तिला व तिच्या मुलाला वाद मिळकतीशिवाय दुसरी जमिन नसल्यामुळे उपासमारीची वेळ येवु शकते. तसेच, आजही वाद जमिन ही गै.अ. क्र.२ हिच्या बक्षिसपत्रानुसार मालकी, सतत ताब्यात व वहितीत आहे. वास्तवीक पाहता तिचे वडिल व सासरे हे जिवंत असताना गै.अ. क्र.१ याच्या नावाने काही जमिन वाटुन दिली. ही बाब त्याच वेळेस अर्जदाराला खटकली कारण अर्जदाराला माहित होते की, गै.अ. क्र.१ हा वेडसर आहे आणि त्याचा वेडसर पणाचा फायदा घेवुन त्याची संपुर्ण जमिन हडप करण्याच्या उददेशाने व अर्जदार हा वाद जमिन त्याच्या नावाने करुन देत असे म्हणुन तिला त्रास देत होता. गै.अ. क्र.२ ही शिक्षीत असल्यामुळे तिला होणार त्रास ती मुलाच्या भविष्याचा विचार करुन सहन करत होती. तिला वाद जमिन व्यतिरिक्त दुसरी जमिन नावाने अथवा ताब्यात नाही. तिच्याकडे वादजमिनी व्यतिरिक्त उदरनिर्वाह करिता दुसरी जमिन नाही. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही दुसरे साधन नाही. अर्जदाराचा वाद जमिनीशी कोणताही हक्क, अधिकार संबंध नाही. तिला वाद जमिन ही बक्षिसपत्राने तिच्या पतीकडुन आलेली आहे व तिच्या ताब्यात आहे.

८. गै.अ. क्र.२ ला अर्जदार म्हणत असे की, वाद जमिन माझे नावाने करुन दे, तुझे बापाने जमिन तुला घेवुन दिली काय, ही जमिन माझीच आहे, सदर जमिन मला पलटवुन दे असे म्हणुन अर्जदार तिला त्रास देत असे. अर्जदार गै.अ. क्र.२ ला त्रास देवुन म्हणत असे की, आता जमिन मी ताब्यात घेतो, तुझेकडुन काय होते ते करुन घे, तुझे मागे कोण येते ते मी बघतो, त्यांना सुध्दा शेतात आले तर जिवाने मारुन टाकीन असे म्हणुन धमक्या देत होता. अर्जदाराने सदरचा दावा हा गै.अ. क्र.२ ला त्रास देण्याच्या दृष्टीने काल्पनीक स्वरुपाचा व खोटे कथन व खोटे आरोप करुन दाखल केलेला असल्यामुळे सदरचा दावा खर्चासह खारीज करण्यात येवुन गै.अ. क्र.२ ला नुकसान भरपाई म्हणुन रक्कम ५०,०००/- रुपये व कॉम्पेनसेटरी कॉस्ट रुपये ५०००/- असे एकुण ५५,०००/- रुपये

अर्जदाराकडुन गै.अ. क्र.२ ला मिळण्याचा आदेश व्हावा. अर्जदाराचा संपुर्ण दावा व निशानी ५ चा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

९. वादीचे विद्वान विधिज्ञ श्री.टी.एम.उंडाळ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२ चे विद्वान विधिज्ञ एस.आर.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

१०. प्रस्तुत अर्जावरुन खालील मुद्दे (वादप्रश्न) विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे (वादप्रश्न) | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याचा अर्ज प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | नाही |
| २. | पुराव्याचा समतोल (Balance of convenience) कोणाच्या बाजुने आहे? | गैरअर्जदाराच्या |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास कोणाचे नुकसान (irreparable loss) होणार आहे? | गैरअर्जदाराचे |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

११. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्ठार्थ वादीच्या वतीने अभिलेखावर निशाणी क्र. ४ सोबत फेरफार, बक्षीसपत्र ०७/०३/२०२२, फेरफार, डॉक्टरांचे प्रमाणपत्र. नि. क्रं ३६ वर दि. मु.नं. ३४/२०२३ मधील नि. ५ वरील आदेश दाखल केला आहे.

१२. याउलट प्रतिवादीनी नि.क्रं.२३ वर तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचीप्रत,७/१२ , फेरफार व नमुना ८ अ दाखल केला आहे.

**मुद्दा क्रं. १ ते ३ करिता –**

१३. मुद्दा क्रं १ ते ३ एकमेकांशी सलंग्नी त असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रितरित्या चर्चेस घेण्यात आले आहे. दोन्ही पक्षाचे कथन

ऐकले. अभिलेखाचे एकंदरित अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार हे ऐकमेकांचे नातेवाईक आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ हे भाउ असून गैरअर्जदार क्रं.२ ही गैरअर्जदार क्रं.१ ची पत्नी आहे.

१४. अर्जदाराच्या वतीने युक्तीवादा दरम्याने वादमिळकत ही गैरअर्जदार क्रं.१ ने स्वइच्छेने गैरअर्जदार क्रं २ चे हक्कात बक्षिस पत्र करुन दिलेले नसून सदरचे बक्षिसपत्र गैरअर्जदार क्रं १ ला मान्य नाही. गैरअर्जदार क्रं २ ने गैरअर्जदार क्रं १ च्या मानसिक रोगाचा गैरफायदा घेउन परपुरुषाची अनैतिक संबंध प्रस्थापित केले. सदर दस्ताची पाहणी केली असता, त्यावरील साक्षीदार हे गैरअर्जदार क्रं २ चे आई आणि भाउ आहे. खरेदी खत व वाटणी पत्र् हे तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्यामुळे गैरअर्जदार क्रं १ हा वाद मिळकतीचा मालक होवू शकत नाही. व त्यास वाद मिळकतीचे बक्षीस पत्र् करण्याचा कोणताही अधिकार नाही.

१५. याउलट गैरअर्जदाराच्या वतीने युक्तीवाद करण्यात आला की, गैरअर्जदार क्रं.२ चे सासरे हे माजी सैनिक होते. त्यांच्या मृत्यूपर्यंत अर्जदार व गैरअर्जदारामध्ये वाद नव्हता. गैरअर्जदार क्रं २ चे सासरे मयत झाल्यानंतर अर्जदार हा घराचा कुटूंब प्रमुख झाला. अर्जदार व गैरअर्जदार क्रं १ च्या वडीलांच्या सांगण्यानुसार गैरअर्जदार क्रं १ हयाच्या नावाने २ हे. जमीन रजिष्टर बक्षिसपत्र करुन दिलेली आहे. गैरअर्जदार क्रं.१ व २ चे अर्जदारासोबत वाटणीबाबत वाद होत होते. गैरअर्जदार क्रं.१ हा वेडसर असल्यामुळे त्याच्या वेडसरपणाचा फायदा घेवून अर्जदार हा वाद मिंळकत हडप करण्याचा पय त करित आहे. असे प्रतीपादन युक्तीवादी दरम्याने करण्यात आले.

१६. गैरअर्जदार क्रं.१ व २ हे पती पत्नी असले तरी ते सोबत राहत नस्ल्याचे कथन दोन्ही पक्षाने केले आहे गैरअर्जदार क्रं १ हा मानसिक रुग्ण असल्याचे कथन अर्जदाराने केले आहे. दोन्ही पक्ष गैरअर्जदार क्रं १ हा वेडसर व मानसिक रुग्ण असल्याचे तोंडी कथन करतात.

१७. **अर्जदाराने मा.सर्वेच्च न्यायालय दिल्ली न्यायानिवाडा दाखल केला आहे.**

The plaintiff has relied on **Civil Appeal No 5717of 2021 Sonamati Devi and Others Vrs. Mahendra Vishwakarma and Others.** Wherein Hon’ble Supreme Court observed in “ The conclusion drawn by the Trial Court were :- Therefore, it is completely established that the

defendant No.01 taking undue benefit of his close relation and blind trust and exercising undue influence on the plaintiff got a gift deed executed in his favour and so an adverse conclusion is drawn against the defendant. The assessment made by the trial court, therefore, did not call for any interference."

The plaintiff also relied on **2001 AIR ( Orissa ) 181: 2001 Cut LT 435 Nabeen Chandra Sahu Vrs. Debasis Sahu** Wherein Hon'ble Orissa High Court has observed in para No. 10 that "In the peculiar facts and circumstances of the case, I am of the considered opinion that the pending suit should be directed to be tried and disposed of at any early date and during it's pendency both the parties should be restrained from alienating any of the suit property without leave of the court in case of exigency and justification. Accordingly, it is directed that the learned civil judge, Aska shall expediate trial of the suit and complete the same preferably within a period of four months from the date of communication of this order. During the pendency of the suit, both the parties are restrained from alienating any of the suit properties. However, liberty is granted to the parties to approach the trial court in case of expendiency or justifiable case for permission to alienate any of the suit properties, which are to be considered on it's own merits, and no opinion whatsoever is expressed on that."

The plaintiff also relied on **2012Mh.LJ 254 s UNIL s/o Madanlal Agrawal Vrs. Jawaharlal S/o Nandlal Chittarke and another**. Wherein it has ben observed by Hon'ble Bombay High Court in para 14 that "in para 25 and 26, it is further observed that , where there is apprehension established that defendant may create third party rights and all three ingredients are satisfied, if temporary injunction is not granted, it may result into multiplicity of proceedings in as much as the alienee pendente lite may apply

for impleadment, which will result in daily in proceeding of the suit. “ In para 15 ‘In the present case defendants i.e. respondents herein have not made out any case that irreparable loss or damages will be caused to them during pendency of the suit if they are not allowed to alter the status quo. In para 16 “ In that view of the matter , in my opinion , during pendency of the suit interest of the appellant is required to be protected , therefore , interim order granted by the trial court during pendency of the application and which was continued even after rejection of the application of the appellant deserves to be continued till disposal of suit.

या प्रकरणातील वस्तुस्थीती आणि हाती आलेले प्रकरण वेगळे आहे. त्यामुळे सरसकट लागु होत नाही.

१८. **याउलट गैरअर्जदाराने मा.उच्च न्यायालय मुंबई न्यायानिवाडे दाखल केलेले आहे.**

The defendant has also relied on **2004 (04) Mh.L.J.) Ajay Mittal Industrial Premises Co-operative Society Vrs. Raj Publicity** Wherein Hon’ble Bombay High Court observed that ‘Temporary injunction granting or refusing. It’s principle It is now well settle that granting or refusing to grant interim injunction is covered by three well established principles, Viz : (01) Whether the petitioner has made out a prima facie case, (02) Whether balance of convenience is in his favour and (03) Whether petitioner will suffer irreparable loss or injury if temporary injunction is refused . Interim reliefs are granted on the basis of the case made out in the pleadings finding that in the interest of justice interim order is necessary in order to prevent wastage or to maintain the situation as on date or from recurrence of certain incident which ere existing as on the date of presenting such application. The court has to take into consideration the balance of convenience and whether the petitioner would suffer any irreparable loss if no

injunction is granted.

The defendant also relied on **(1996(02) B.C.J.172) Prakash S. Akotkar and others Vrs. Mansoor Kha Gulab Kha and others** wherein it has been observed b Hon’ble Bombay High Court that ‘Proposed alienee from one co-owner in possession of land can not claim injunction against other co-owner. Possession of one co – owner is for and on behalf of others. He has no *prima facie case*. Character of his possession is that of co-owner . He is not entitled for relief of injunction.

१९. दोन्ही बाजुकडील युक्तीवाद, कथने व प्रथमदर्शीनी सादर करण्यात आलेले कागदपत्राचे आधारे प्रस्तुत अर्जाच विवेचन करावे लागेल. याठिकाणी प्रथमतः अर्जदाराने बक्षिसपत्र दाखल केलेल्या बक्षिसपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की गैरअर्जदार क्र.१ ने गैरअर्जदार क्रं.२ च्या नावे दि. ०७/०३/२०२२ रोजी करुन दिले आहे. सदरचे बक्षिस पत्र हे २ हे. आर चे आहे.फेरफार क्रं १६९८ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की,गैरअर्जदार क्रं १ ने दि. १३/०४/२००५ रोजी सुभाष शामराव राउत यांच्या कडून गट नं ७ मध्ये १ हे. जमीन विकत घेतल्याचे दिसून येते. फेरफार क्रं.२०२७ चे अवलोकन केले असता अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ मध्ये गट नं ७ मध्ये जमीनीची वाटणी झाल्याची दिसून येते. ७/१२ उतारा मध्ये गैरअर्जदार क्रं १ हयाच्या नावे २ हे. क्षेत्र असल्याचे दिसून येते. गावनमुना ८–अ मध्ये गैरअर्जदार क्रं.१ याच्या नावे २ हे. जमीन असल्याचे दिसून येते. वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये गैरअर्जदार क्रं.१ हा सायक्रोलॉजीकल डिसऑर्डर असल्याचे नमुद केले आहे.

२०. गैरअर्जदार क्रं २ ने दि. मु. नं ३४ /२०२३ लता वि संदिप दिवाणी न्यायाधीश क. स्तर रिसोड. येथील दाखल नि.५ च्या अर्जाची प्रत केल्याची प्रत दाखल केली आहे. ७/१२ उता–याची प्रत व गाव नमुना ८ अ दि. २५/०३/२०२३ रोजीची असून अभिलेखावर दाखल केली आहे. सदर कागदपत्रामध्ये गैरअर्जदार क्रं २ चे नाव दिसून येते. तसेच गैरअर्जदार क्रं २ ने फेरफार क्रं २४०५ दाखल केला आहे. सदर कागदपत्र हा दि. २७/०३/२०२३ चा असल्याचे दिसुन येते व त्यामध्ये गैरअर्जदार क्रं.१ ने गैरअर्जदार क्रं.२ च्या नावे

विनामूल्य बक्षिस दिल्याने बक्षिसपत्र लिहून घेण्या–याचे नाव गाव नमुना नं ७/१२ वर दाखल केल्याचे नमुद केले आहेत.

२१. गैरअर्जदार क्रं.१ हा वेडसर किंवा मानसिक रुग्ण आहे याबाबत अभिलेखावर वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदरचे प्रमाणपत्र हे न्यायालयीन बाबीकरिता उपयुक्त नसल्याचे नमुद केले आहे. बक्षिसपत्र व फेरफार या कागदपत्रांना अर्जदाराने अव्हानित केले नाही. गैरअर्जदाराने दाखल केलेल्या ७/१२ व फेरफार मध्ये गैरअर्जदार क्रं २ चे नाव असल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या म्हणनानुसार गैरअर्जदार क्रं.२ ने वाद जमीनीच्या वहितीत अडथळा केला आहे याबाबत अर्जदाराने अभिलेखावर कागदपत्् दाखल केले नाही. बक्षिसपत्् गैरअर्जदार क्र.२ च्या नावे असल्याचे अर्जदाराने मान्य केले आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ हा वेडसर आहे व तो वेडसर असल्याने त्याच्यावतीने हितसंबंध जोपासणा–या इतर कोणत्याही सुज्ञ व्यक्तिची नेमणुक या दाव्यात किंवा नियमित दिवाणी दावा क्रं ३४/२०२३ मध्ये केल्याचे दिसून आले नाही. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये गैरअर्जदार क्रं १ हा सायकोलॉजिकल डिसऑर्डरने ग्रासलेला असल्याचे नमुद केले असले तरी सदर चे प्रमाणपत्र हे न्यायालयीन प्रक्रिया कायदेशीर बाबी करिता उपयुक्त नसल्याचे नमुद केलेले आहे.

अर्जदाराच्या वकीलांनी कथन केले की, बक्षीसपत्राच्या वैधतेकरीता आवश्यक असलेल्या सर्व घटकांची पुर्तता झालेले नाही. त्यामुळे सदर बक्षीसपत्र दोषपुर्ण आहे. सदर प्रकरणात दाखल वादग्रस्त बक्षीसपत्र हे वैध आहे किंवा दोषपुर्ण आहे. आणि मालमत्ता हस्तानतर कायदयाच्या कलम १२३ मध्ये घटकांची पुर्तता झाली किंवा नाही हे पुराव्या अंती स्पष्ट होईल. दाखल दस्तऐवज गैरअर्जदार क्र. ०२ च्या नावे असल्याचे दिसुन येते. सदर दस्ताऐवज वरुण वाद मिळकत गैरअर्जदार क्र. ०२ च्या ताब्यात असल्याची बाब या घडीला स्पष्ट होते.

२२. प्रस्तुत अर्जात समाविष्ट असलेला न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे व प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास अर्जदाराच्या किती अपाय/नुकसान होईल याबाबीसह अर्ज मंजुर केल्यास गैरअर्जदार किती अपाय/नुकसान होईल याबाबीचा विचार करणे देखील गरजेचे आहे. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे यावरुन तौलानिक बाजु ही प्रथमदर्शनी गैरअर्जदाराच्या बाजुने आहे. अशा

परिस्थितीत अर्ज नामंजुर केल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब न्यायाचा समतोल सुध्दा अर्जदाराच्या बाजुने असल्याचे दिसुन येत नाही.वरील विवेचनावरुन व परिस्थितीचा विचार करता वादप्रश्नातील तीन्ही बाबी हे अर्जदाराच्या हक्कात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. सबब, वरील वादप्रश्न क्र. १ ते ३ यांचे निष्कर्ष नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ४ –**

२४. वरील विवेचन व निष्कर्षावरुन सदर वादप्रश्नाच्या निष्कर्षात खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. निशाणी क्र.५ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ठ करण्यात यावा.

स्वा./
(श्रीमती पी.एम.कांबळे)
दिनांक :– ०५/०८/२०२३. २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रिसोड.

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | |
| Court | :- | 2nd Jt. Civil Court,J.D.,Risod |
| Date:- | :- | 05-08-2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 05-08-2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 05-08-2023 |